# प्रकरण सातवे

## उपसंहार

# प्रकरण सातवे

# उपसंहार

## 7·1 सारांश :-

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात बळीराजा धरणाच्या उभारणीमुळे निर्माण झालेल्या वादाचा अभ्यास केला आहे· या अभ्यासात बळीराजा धरण वादामध्ये कोणत्या प्रकारचे विकासाचे आणि अधिकाराचे प्रश्न गुंतले होते याची चर्चा केली आहे· तसेच जनतेने विकासासाठी चळवळ सुरू केली, आंदोलन उभारले, ही जनतेची चळवळ शासनाने दडपून टाकण्याचा कशा पध्दतीने प्रयत्न केला, परंतु लोकलढयाच्याव्दारे धरण आंदोलकांनी शासनाच्या निर्णय प्रक्रियेवर कशाप्रकारे प्रभाव टाकला आणि शेवटी शासनाला बळीराजा धरणाला मान्यता का द्यावी लागली याचा अभ्यास प्रबंधिकेमध्ये केला आहे·

प्रस्तुत प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणात भारतातील विकासाच्या राजकारणाचा अभ्यास केला आहे· स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात अनेक विकासाच्या योजना शासनाने सुरू केल्या· त्यात सामुदायिक विकास योजना, सहकारी चळवळ आणि पंचायत राज्य यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो· ग्रामीण विकासासाठी या प्रकारच्या अनेक योजना राबविण्यात आल्या· परंतु या योजनांच्यापासून दुष्काळग्रस्त प्रदेश वंचित राहिलेला आढळतो· विकास प्रक्रियेतून पुढे आलेल्या ग्रामीण नेतृत्वाने विकासाचा बराचसा फायदा आपल्या पदरात पाडून घेतला· केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी आपले हितसंबंध जोपासण्यासाठी या नेतृत्वाला मदत केली आणि यातून काही विकासाची बेटेच तयार झाली आणि बेटामधून एक नवीन सधनवर्ग तयार झाला· थोडक्यात आधुनिक संरजामदार वर्ग निर्माण झाला· राजकीय सत्तेत आणि विकास प्रक्रियेत या वर्गाचीच मक्तेदारी निर्माण झाली· पश्चिम महाराष्ट्राच्या सांगली जिल्हयातही या प्रकारचीच अवस्था आढळते· या विकास प्रक्रियेतून निर्माण झालेल्या असंतोषामधूनच सांगली जिल्हयातील अविकसित भागात अनेक

आंदोलने, चळवळी सुरू झाल्या. खानापूर तालुक्यातील या राबणा-यांच्या चळवळीमधूनच "बळीराजा आंदोलन" सुरू झाले.

दुष्काळी भागातील जनतेने स्वतःच विकासाचा नवा प्रयोग बळीराजा धरणाच्या रूपाने सुरू केला. या धरणाला शासनाने मदत तर केली नाहीच परंतु स्थानिक सरकारी अधिका-यापासून मंत्र्यापर्यंतच्या सर्व सरकारी यंत्रणेने, प्रस्थापित राजकीय मंडळींनी, धरणाला विरोध करून ते मोडून काढण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी राज्यातील स्वयंसेवी संस्था, पत्रकार, विद्यार्थी, शिक्षक, कष्टकरी शेतकरी, कामगार, लोकविज्ञान संघटना, वकील, स्वातंत्र्य सैनिक, डॉक्टर आणि सर्वसामान्य जनतेने तसेच डाव्या विचारांच्या पक्षांनी बळीराजा धरणाला सक्रिय पाठिंबा दिला. त्यामुळे हे धरण पूर्ण झाले आणि संपूर्ण देशात प्रसिध्दीला आले. या प्रकारचे धरण लोकांनी स्वबळावर उभे करून पर्यायी विकासनीतीचा प्रत्यक्ष अवलंब सुरू केला. बळीराजाचा हा प्रयोग सर्वांना समजावा या उद्देशाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे. प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या अभ्यास साधनांचा उपयोग करण्यात आला.

बलवडी-तांदुळवाडी या गावांच्या भौगोलिक, आर्थिक, ऐतिहासिक आणि राजकीय परिस्थितीतून "बळीराजा धरण"चा जन्म झाला. या सर्व पार्श्वभूमीचा अभ्यास प्रबंधिकेच्या दुस-या प्रकरणात केला आहे. बळीराजा परिसर हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येतो. येथील जमीन मूरमाड-कमी प्रतीची आहे. शेतीच्या दृष्टीने ती कमी महत्त्वाची आहे. येथील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे अशक्य झाले आहे. पावसाची दिवसेंदिवस अनिश्चितता वाढत आहे. त्यामुळे उद्योगधंद्याच्या निमित्ताने येथील बहुतांशी जनता शहराकडे स्थलांतरित झालेली आढळते. हे दुष्टचक्र वर्षानुवर्षे चालत आले आहे. शासनानेही दुष्काळ हटविण्यासाठी, शेती विकासासाठी मोठा पाटबंधारे प्रकल्प कार्यान्वित केला नाही. या परिसराने स्वातंत्र्य चळवळीत अत्यंत मोलाची कामगिरी केली आहे. क्रांतिसिंहाची आणि प्रतिसरकारची कर्मभूमी म्हणून हा परिसर ओळखला जातो. सत्यशोधक चळवळीची आणि पुरोगामी विचाराची परंपरा असणारा हा परिसर शैक्षणिक सुविधापासून वंचित राहिला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपासून 1957 चा अपवाद वगळता येथील मतदारांनी विधानसभेत कॉंग्रेसचा उमेदवार पाठविला आहे. तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद, तालुक्यातील इतर सहकारी संस्था कॉंग्रेसच्या

ताब्यात आहेत असे असले तरी येथील काँग्रेस नेतृत्वाला तालुक्याचा विकास घडवून आणण्यात अपयश आल्याचे दिसते. काँग्रेसंतर्गत येथे सुरुवातीपासूनच अनेक गट कार्यरत आहेत.

बलवडी व तांदुळवाडी ही गावे स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिसिंह नाना पाटलांच्या कर्मभूमीतील म्हणून ओळखली जातात. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर येथे शे.का.पक्षाचा प्रभाव आढळतो. या दोन्ही गावातील ग्रामपंचायती आणि सहकारी सोसायटी सुरुवातीपासूनच शे.का.पक्षाच्या ताब्यात आहेत. अलिकडे मात्र येथे सत्तापालट होऊन या संस्था काँग्रेसने जिंकून आपल्या अधिपत्याखाली आणल्या आहेत. विरोधी पक्षांची गावे म्हणून सत्ताधा-यांनी हेतू-पुरस्सर विकासाच्याबाबत त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते.

प्रस्तुत प्रबंधिकेच्या तिस-या प्रकरणात बळीराजा धरण उभारणीत सिंहाचा वाटा असणा-या खानापूर तालुक्यातील मुक्ती संघर्ष चळवळीचा अभ्यास केलेला आहे. डॉ.भारत पाटणकर, संपतराव पवार आणि त्यांच्या सहका-यांनी 1982 च्या संपाने बेकार झालेल्या गिरणी कामगारांच्या मदतीने कष्टकरी जनतेची मुक्ती संघर्ष समिती स्थापन केली. या श्रमिक मुक्ती दलाने आपल्या विधायक कार्यक्रमाव्दारे प्रस्थापित राजकीय पक्षांना शह तर दिलाच त्याशिवाय जिल्हयाच्या राजकारणात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले. या चळवळीच्या निमित्ताने शेतक-यांची स्वतंत्र संघटना उदयाला आली. शेतकरी, कामगार यांच्या महत्त्वाच्या प्रश्नासाठी चळवळीने संघर्ष केला. तसेच स्त्रीमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, परित्यक्तांचा प्रश्न, वैज्ञानिक दृष्टिकोण, सामाजिक समता, दुष्काळ निर्मूलन या कार्यक्रमाव्दारे सामाजिक प्रबोधन, राजकीय जागृती आणि स्वावलंबी व निर्भर समाज उभा करण्याचे महत्त्वाचे काम केले. मुक्ती संघर्ष चळवळीने तालुक्यातील लोकांना दुष्काळ विरोधी उपाय योजना करण्यासाठी उभे केले. त्यासाठी लोकविज्ञान संघटना आणि शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य घेतले. मुक्ती संघर्ष चळवळीला नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न प्रस्थापित राजकीय मंडळी आणि मोठे जमीनदार, भांडवलदार यांनी केला. तिच्याविषयी गैरसमज पसरविले. परंतु चळवळीच्या विधायक भूमिकेमुळे आणि जनतेच्या वाढत्या पाठिंब्यामुळे ही चळवळ दिवसेंदिवस वाढत आहे.

प्रबंधिकेच्या चौथ्या प्रकरणात बळीराजा धरणाची गरज आणि धरण बांधणी मागची ऐतिहासिक पार्श्वभूमी याचा अभ्यास केला आहे. 1972 पासून खानापूर तालुक्यात

दुष्काळाने सतत थैमान मांडल्याचे दिसते· दुष्काळाने येरळेचे पात्र कोरडे पडले- त्यातील वाळूची शासनाने महसूल गोळा करण्यासाठी लिलाव पध्दतीने विक्री सुरू केली· परंतु शासकीय अधिकारी आणि वाळू कंत्राटदार यांनी वाळूतून अमाप संपत्ती मिळविण्याच्या हव्यासापोटी तिचा बेसुमार उपसा केला· यातून पर्यावरणाला धोका निर्माण होतो· याची पर्वा या मंडळींना नव्हती· दुष्काळामुळे वाळू विक्रीचा धंदा जसा वाढत गेला तसाच पर्यावरण असंतुलनामुळे दुष्काळाची तीव्रताही वाढतच होती· म्हणून शेवटी येथील जनतेनेच दुष्काळ हटविण्यासाठी या नैसर्गिक संपत्तीचा वापर करण्याचे ठरविले· येरळा मातेच्या कठीण परिस्थितीतसुध्दा तिच्याकडून मिळणारी संपत्ती तिलाच पाण्याच्या रूपाने परत करण्याचा मार्ग याच विचाराच्या मार्गातून बळीराजा धरण कल्पनेचा जन्म झाला· येथील जनतेने कोल्हापूर फड पध्दत आणि फुल्यांच्या आसूडाच्या पार्श्वभूमीवर हे धरण बांधण्याचे ठरविले·

बळीराजा धरण म्हणजे कष्टक-यांनी दुष्काळ हटविण्यासाठी अंमलात आणलेले धोरण आहे· परंतु या प्रकारचे धरण बांधण्यास शासनाने आडकाठी आणली तेव्हा या चळवळीने संपूर्ण येरळा खो-यातील खानापूर, तासगाव व मिरज तालुक्यात या धरणाचे महत्त्व आणि आवश्यकता पटवून दिली आणि लोकजागृती करून लोकलढा उभा केला· यासाठी अनेक डाव्या विचारांचे राजकीय पक्ष, राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कामगार संघटना, विद्यार्थी, कष्टकरी जनता, सेवाभावी संस्था, वृत्तपत्रे यांचा नैतिक पाठिंबा मिळाला· या लोकलढयाच्या रेटयामुळे शासनाला या धरणास मान्यता द्यावी लागली· धरण आंदोलकांनी बळीराजाच्या रूपाने उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीवर जनतेचा अधिकार निसर्ग संपत्तीचा योग्य वापर, पर्यावरण संतुलन, विकास कामात जनतेचा सहभाग, पाण्याचे न्यायी पध्दतीने वाटप, स्वावलंबी व निर्भर शेती, दुष्काळ निर्मूलन, रोजगारनिर्मिती, अनुभव जुन्या विज्ञानाचा वापर या प्रकारची मानवमुक्ती आणि शोषणमुक्तीची भूमिका पुढे आणली·

प्रस्तुत प्रबंधिकेच्या पाचव्या प्रकरणात बळीराजा धरण प्रकल्प उभारणीचा अभ्यास केला आहे· तसेच प्रसिध्द सिंचनतज्ज्ञ के·आर·दाते यांनी बळीराजा धरणाचा तयार केलेला बहुउद्देशीय आराखडा याचा अभ्यास केला आहे· श्री·दातेंनी बळीराजा धरणाच्या प्लॅन इस्टिमेटमध्ये मांडलेली आकडेवारी फारच मोठे शिक्षण देणारी आहे·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ज्यांना नेहमीच्या धरणाची आणि लिफ्ट इरिगेशनची पाणी वाटप पध्दती माहीत आहे· त्यांना यातून शिकण्यासारखे बरेच आहे· ज्यांना दुष्काळ हटविण्यात रस आहे· अशा दुष्काळग्रस्त कष्टक-यांना तर शिकण्यासारखे सर्वच आहे· एकंदरीत एकूण 3,09,000 रूपयात 120 मीटर लांब आणि 4·5 मीटर उंचीचा बंधारा बांधून एकूण 20·5 दशलक्ष घनफूट पाण्याचा साठा केला आहे· या धरणातून कोणतेही गाव अगर कुटुंब स्थलांतरित करावे लागणार नाही· तसेच या धरणातून 380 हेक्टर्स क्षेत्राला पाणी पुरवठा केला जाणार आहे· सध्या या धरणातून तांदुळवाडी गावच्या 105 सभासदांच्या 300 एकर जमिनीसाठी उपसा जलसिंचन योजनेव्दारे पाणी पुरवठा केला आहे· त्यासाठी वापरलेली पाईप्स भारतातील कच्च्या मालावरील आधारित तयार केलेली आहे· बळीराजा धरण आणि उपसा जलसिंचन योजना कमीत कमी खर्चात पूर्ण केली आहे·

धरण बांधणीच्या कामात मुक्ती संघर्ष चळवळीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे· तसेच बळीराजा धरण कृती समिती, शिवाजी विद्यापीठ, सेवाभावी संस्था, वृत्तपत्रे, आणि कष्टकरी जनता यांचाही सहभाग महत्त्वाचा आहे· बळीराजा धरणाचे बांधकाम विद्यार्थी, कष्टकरी जनता यांच्या श्रमदानातून काही प्रमाणात उभे राहिले आहे· त्याचबरोबर सततचे श्रमदान करणे अशक्य होते· कारण येथील दुष्काळपीडित लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर होता· त्यामुळे काही बांधकाम हे मजूरी देवून पूर्ण केले· तसेच बांधकामासाठी आवश्यक असणारे साहित्य उदा·सिमेंट, दगड, लोखंड इ·खरेदी करण्यासाठी भांडवलाची गरज असते· हे भांडवल धरण आंदोलकांनी शासनाकडून वाळू परवाने घेवून उभे केले· तसेच धरणाच्या शेअर्स विक्रीतूनही काही भांडवल गोळा केले· अडचणीच्या काळात आंदोलकांनी राज्यातील काही सेवाभावी संस्था व व्यक्ती यांच्याकडून "परतफेड निधी" उभा करून धरण बांधकाम पूर्ण केले·

प्रस्तुत प्रबंधिकेच्या सहाव्या प्रकरणात, पर्यायी विकासनीतीच्या प्राथमिक आणि काही विशिष्ट अंगाचा विकास कष्टकरी स्त्री-पुरूषांच्या ताबडतोबीच्या चळवळीत कसा होऊ शकतो, याचा बळीराजाच्या निमित्ताने अभ्यास केला आहे· प्रत्येक स्त्री-पुरूषाला जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्वतःचा अनिर्बंध विकास साधता येईल, आनंदी सामुहिक जीवन जगता येईल अशा विकासनीतीचा विचार पर्याय म्हणून बळीराजाने स्वीकारला· तसेच

शोषणमुक्त जीवन आणि निरोगी **व विपुल निसर्ग परिसर** हा या बळीराजाच्या विकासनीतीचा पाया आहे·

बळीराजा आंदोलकांनी धरण बांधकाम आणि उपसा जलसिंचन योजनाबाबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे· स्वयंचलित दरवाजे, फ्लशडोअर्स यांचा वापर करून धरणाचा उद्देश सफल केला· त्याचबरोबर स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होणारी पाणी वितरण यंत्रणा कार्यान्वित केली· कमीत कमी खर्चात धरण आणि लिफ्ट इरिगेशन स्कीम पूर्ण केली· तसेच पाणी वितरणासाठी आवश्यक असणा-या पाईप्स, टाक्या या भारतातील कच्च्या मालावर आधारित तयार केलेल्याच वापरल्या· बळीराजा बांधकामासाठी दगड, वाळू यासारखे साहित्य स्थानिक पातळीवर उपलब्ध झाले· परंतु त्याचबरोबर धरण बांधकामासाठी आवश्यक असणारे भांडवल येरळेच्या वाळू विक्रीतून निर्माण केले· हे धरण कष्टकरी जनता, विद्यार्थी, पत्रकार, शिक्षक, वकील, डॉक्टर, होमगार्डस, अभियंते इत्यादिंच्या श्रमदानातून उभे राहिले आहे· तसेच दुष्काळामुळे निर्माण झालेला बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी जास्तीत जास्त लोकांना या धरण बांधकामात रोजगार उपलब्ध करून दिला· मनुष्यबळाचा जास्तीत जास्त वापर करून आणि कमीत कमी बजेटमध्ये हे धरण पूर्ण केले आहे·

बळीराजा धरणातील पाण्यावर सर्व कष्टकरी जनतेची मालकी प्रस्थापित केली आहे· "ज्याला जमीन जास्त, त्याला पाणी जास्त" हे प्रस्थापित विकासनीतीचे तत्व बळीराजाने दूर फेकून दिले· विधवा, परित्यक्ता, भूमीहिनासह सर्वांना पाण्याचा हक्क दिला· बळीराजातील पाणी समान पध्दतीने वाटप करून एक प्रकारचा सामाजिक न्याय प्रस्थापित केला· सहकारी पाणी वितरण व्यवस्था निर्माण करून पाणी वाटपावर राबणा-या जनतेचे नियंत्रण प्रस्थापित केले· स्त्रिया आणि भूमीहिनांना पाण्याचा हक्क दिला· त्यातून जमीन वापराविषयी आणि जमिनीवरच्या असमान हक्कांविषयी महत्त्वाचे प्रश्न उभे केले· पीक पध्दत ठरविणे, पाण्याच्या वापराची पध्दत ठरविणे या गोष्टी सर्वच राबणा-या जनतेच्या सामुदायिक निर्णयाने झाल्या पाहिजेत असे तत्व बळीराजाने पुढे आणले· रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या दावणीला बांधली गेलेली शेती बळीराजा चळवळीने नाकारली· वनशेतीवर आधारित, पालापाचोळ्या खताचा पाया करणारी, कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पन्न घेणारी, जास्तीत जास्त स्वावलंबी शेती बळीराजासाठी प्रयोग करून स्वीकारली· प्रयोग करून शेतीपध्दत स्वतः ठरविण्याचा, त्यासाठी हक्काचे

पाणी मिळविण्याचा अधिकार बळीराजा चळवचळीतून प्रस्थापित झाला. विज्ञान-तंत्रज्ञाना-चा गठ्ठा कष्टकरी जनता स्वतःच्या ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या आधारावर तपासून घेऊनच स्वीकारेल हा बळीराजाने व्यवहार सुरू केला. तसेच नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग स्थानिक लोकांचा विकास करण्यासाठीच झाला पाहिजे हे तत्व बळीराजाने पुढे आणून व्यवहारात प्रस्थापित केले. या बाबतीतल्या निर्णयातला राबणा-या जनतेचा सहभाग प्रस्थापित केला. नैसर्गिक साधन संपत्तीच्या बेसुमार लुटीला चळवळीने निर्बंध घातला. त्याचबरोबर याच नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर दुष्काळ निर्मूलनासाठी आणि पर्यायाने पर्यावरणाचे संतुलन निरोगी पध्दतीने पुनः उभारणीसाठी कसा केला जाऊ शकतो हा विचार बळीराजाच्या उभारणीतून आंदोलकांनी प्रत्यक्ष व्यवहारात आणला. संतुलित पीक पध्दतीचा अवलंब करून कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पादन शेतीमध्ये कसे घेता येते हे बळीराजाच्या पर्यायी शेती पध्दतीने दाखवून दिले. तसेच या शेती पध्दतीमुळे जमिनीचा कस आणि पोत चांगल्याप्रकारे राखून शेतकरी स्वावलंबी आणि निर्भर बनू शकतो हेही प्रत्यक्ष प्रयोगाने बळीराजा आंदोलकांनी दाखवून दिले. एकंदरीत बळीराजाची उभारणी करून दुष्काळाचे नियोजन आमचे आम्ही करू शकतो आणि ते अंमलात आणण्याचा आम्हाला हक्क आहे हे आंदोलकांनी सिध्द केले. त्याचबरोबर सरकार दुष्काळ घालविल तेव्हा दुष्काळ जाणार हा व्यवहारही बळीराजा धरण आंदोलकांनी फेटाळला.

## 7.2 <u>अभ्यासाचे निष्कर्ष :-</u>

बळीराजा धरण चळवळीचा अभ्यास करताना पुढील निष्कर्ष हाती येतात. येरळा नदीवर बांधावयाच्या या धरणाबाबतचा वाद जवळ जवळ 7 वर्षे चालला आणि सर्व देशभर गाजला. कारण हे धरण स्वतः कष्टकरी जनता शासनाच्या मदतीशिवाय बांधत होती. तसेच या धरणाच्या रूपाने चळवळीने पर्यायी विकासनीतीचे तत्व प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या धरण चळवळीला एक वेगळेच राजकीय महत्त्व प्राप्त झाले.

1. स्वातंत्र्योत्तर काळात विकास प्रक्रियेत काही भागांचाच विकास झाला आणि विकासाची काही बेटेच तयार झाली. हे आपण सुरूवातीला पाहिले आहे. ग्रामीण

विकासाच्या एका पर्वानंतरही प·महाराष्ट्रातील सांगली-सातारा जिल्हयाचा पूर्व भाग विकास योजनेपासून वंचित राहिलेला आढळतो· सांगली जिल्हयातील खानापूर हा दुष्काळ प्रवण तालुका त्यापैकी एक अविकसित असा भाग आहे· येथील दुष्काळाबाबत शासनाने गंभीरपणे विचार करुन कायमस्वरूपी त्यावर उपाय योजना केली नाही· तसेच या तालुक्याकडे राज्य व जिल्हा नेतृत्वाने विकास कामाबाबतही दुर्लक्ष केल्याचे जाणवते· शेती विकासासाठी येथे कोणताही मोठा पाटबंधारे प्रकल्प कार्यान्वित झालेला आढळत नाही· अलिकडे या भागाला वरदान ठरणारी कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन योजना §ताकारी योजना§ कै·वसंतराव दादांनी सुरू केली· परंतु प्रादेशिक राजकारणातून या योजनेलाही काही राजकीय मंडळीनी विरोध करण्याचा प्रयत्न केल्यामुळे ती अनेक वर्षापासून रेंगाळत राहिली आहे· दुष्काळी भागाचे भवितव्य ठरविणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प निश्चित कधी पूर्ण होणार यासाठी येथील जनता सतत शासनाकडे आशाळभूत नजरेने पाहत आहे· तसेच या भागाच्या विकासाच्या दृष्टीने कोणताही मोठा औद्योगिक प्रकल्प अस्तित्वात नाही·

या पार्श्वभूमीवर "बळीराजा धरण आंदोलकांनी" बळीराजा धरण बांधून जनता स्वतः स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनू शकते असा दावा केला आहे· स्वतःच्या प्रयत्नाने जनता स्वतःचाही विकास करू शकते असेही त्यांचे म्हणणे आहे· त्यांच्या मते बळीराजा हे केवळ धरण नसून ती दुष्काळ हटविण्याची एक चळवळ आहे· शासनाला दुष्काळ नष्ट करावयाचा नसेल, त्यांच्याकडे दुष्काळ निर्मूलनाचे नियोजन नसेल तर दुष्काळ निर्मूलनाचा विचार जनतेला स्वतःलाच केला पाहिजे, त्याचे नियोजनसुध्दा तिनेच केले पाहिजे, संघर्षाव्दारे शासनाला ते अंमलात आणण्यास भाग पाडले पाहिजे·[1] हा विचार ठामपणे बळीराजाने पुढे आणला· एकंदरीत दुष्काळ हटविण्याचा एक नवा मार्गच बळीराजाच्या रूपाने जनतेसमोर आला·

2· धरणासारख्या योजना शासनाने राबवायच्या असतात· परंतु बलवडी-तांदुळवाडीच्या जनतेने या प्रकारचे धरण वैयक्तिक जबाबदारी, शासनाची आर्थिक मदत न घेता स्वबळावर बांधले· कमी पैशात आणि लोकांच्याकडून स्वयंस्फूर्तीने होणा-या या धरणामुळे सरकारी अधिका-यांच्या हितसंबंधाला धोका पोहोचला होता· त्यामुळे त्यांनी विरोधाचा पवित्रा घेतला· सधन भागातील §सांगली जिल्हा पश्चिम भाग§ नेतृत्वाने

तसेच या परिसरातील लोकप्रतिनिधींनी, प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला धक्का बसतो म्हणून या चळवळीला सुरुवातीपासूनच विरोध सुरू केला होता. म्हणजेच प्रस्थापित नेतृत्व व सरकारी अधिकारी यांच्या हितसंबंधातून या धरणाला विरोध सुरू होता.

बळीराजा स्मृती धरणाच्या क्षेत्रात दरडोई समान पाणी वाटप होऊन भूमीहिन, स्त्रिया, परित्यक्ता यासह राबणा-या सर्व जनतेला पाण्याचा हक्क मिळणार आहे. यामुळे पाण्याच्या समान हक्कापाठोपाठ समान जमीन वाटपाचा प्रश्न निर्माण होईल या भीतीपोटी जमीनदार, बागायतदार यांनी या धरणाला विरोध केला. तसेच पाण्यावरील ठराविक लोकांची मक्तेदारी बळीराजाने नाकारली त्यामुळे बडया बागायतदारांच्या पाण्याच्या बाबतीतील दादागिरीला पायबंद तर बसणार आहेच त्याचबरोबर या मंडळींना स्वस्त मजुरांचा पुरवठाही होणार नाही. कारण बळीराजाचे उदाहरण दुष्काळग्रस्तांचे मार्गदर्शन ठरणार आहे त्या आधारावर चळवळ वाढणार आहे.[2] एकंदरीत मोठे जमीनदारांच्या अस्तित्वालाच बळीराजाने आव्हान दिले आहे.

3. नद्यांच्या पात्रातील वाळू ही सरकारी संपत्ती आहे. शासन या संपत्तीची विक्री तहसीलदार कार्यालयामार्फत करीत असते. परंतु बळीराजा चळवळीने ही नैसर्गिक संपत्ती स्थानिक लोकांच्या विकासासाठी वापरली पाहिजे हे तत्व पुढे आणले. येरळेच्या पात्रातील वाळूचा कंत्राटी पध्दतीने लिलाव करून व्यापार करण्याच्या शासनाच्या धोरणाला चळवळीने विरोध केला. शासनाबरोबर संघर्ष करून धरणाच्या बांधकाम भांडवलासाठी वाळू विक्रीचे परवाने आंदोलकांनी मिळविले. तसेच वाळू पर्यावरण कमिटीच्या शिफारशीप्रमाणे शासनास वाळू उपसा करण्यास भाग पाडले. या धरणाचे उदाहरण घेऊन खानापूर व तासगाव तालुक्यातील बहुसंख्य गावांनी वाळूच्या कंत्राटी लिलाव विक्रीस विरोध केला. ही वाळू विक्री धरणे बांधण्यासाठीच वापरण्याचा आग्रह धरला.[3] तसेच चळवळीने सर्वोच्च न्यायालयामार्फत येरळेच्या पात्रातील नांद्रे, वसगडे, रामापूर या क्षेत्रातील वाळू विक्रीस शासनाला बंदी घातलेली आहे.[4] एकंदरीत बळीराजा धरण चळवळीच्या सततच्या लढयामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर स्थानिक लोकांचा हक्क प्रस्थापित झाला आणि पर्यावरण संतुलनासाठी शासनाला धोरण बदलणे भाग पाडले.

बळीराजा धरण चळवळीने या परिसरातील शिवाजी विद्यापीठाशी सतत सुसंवाद साधून विद्यापीठास दुष्काळाचा अभ्यास करण्यास भाग पाडले. तसेच दुष्काळ निर्मूलनाच्या

कार्यक्रमात विद्यापीठाला प्रत्यक्ष सहभागी करून घेवून राबणा-या जनतेच्या दृष्टिकोनातून आणि हितसंबंधासाठी ज्ञानाचा वापर करावयास लावले. शिवाजी विद्यापीठानेही आपली सर्व शक्ती या परिसरातील दुष्काळ निर्मूलनासाठी वापरली आणि कष्टकरी जनतेच्या हितसंबंधासाठी कार्य करणारे भारतातले पहिले विद्यापीठ म्हणून इतरांच्यासमोर आदर्श निर्माण केला.

4. राजकीय पक्ष पातळीवर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खानापूर तालुक्यात कॉंग्रेस, शे.का.पक्ष आणि इतर डावे पक्ष कार्यरत आहेत. परंतु शेतक-यांची स्वतंत्र अशी संघटना या तालुक्यात अस्तित्वात नव्हती. मुक्ती संघर्ष चळवळीच्या स्थापनेमुळे या प्रकारची शेतक-यांची स्वतंत्ररित्या संघटना अस्तित्वात आली. या संघटनेने शेतक-यांचे सर्व प्रश्न हाती घेवून ते सोडविण्यासाठी संघर्ष सुरू केला. त्याचबरोबर समाजप्रबोधन, राजकीय जागृती, अंधश्रध्दा निर्मूलन, लोकशिक्षण यासारखी विधायक कामेही हाती घेतली. बळीराजाची उभारणी करून दुष्काळावर उपाय योजना करण्याचा प्रयोग सुरू केला. त्याचप्रमाणे शास्त्रीय शेती, पर्यावरण संतुलन, समान पाणी वाटप, यासारखी धोरणे प्रत्यक्षात राबविण्यास सुरुवात केली. सर्वसामान्य लोकांचे ज्वलंत प्रश्न या चळवळीने हाती घेतल्यामुळे ती जनतेची चळवळ बनली. बळीराजाच्या उभारणीमुळे ती देशभर प्रसिध्दीला आली. पर्यायी विकासनीतीचा अवलंब केल्यामुळे खानापूर तालुक्यात आणि सांगली जिल्हयात तिचा प्रभाव वाढला. शासकीय अधिकारी, मंत्री, प्रस्थापित राजकीय मंडळी आणि मोठे बागायतदार व भांडवलदार यांना या चळवळीचे वाढते प्राबल्य सहन झाले नाही. तसेच या चळवळीने या प्रस्थापित मंडळीच्या हितसंबंधाला धोका निर्माण झाला. त्यामुळे या मंडळींनी चळवळीविरूध्द जनतेत गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला. परंतु या चळवळीतील निष्कलंक, निःस्वार्थी, जिद्दी आणि तत्वनिष्ठ कार्यकर्त्यामुळे ती नष्ट न होता उलट मोठया प्रमाणात संघटित झाली. याशिवाय तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने चळवळीच्या कार्याला वाहून घेतले. चळवळीच्या विधायक तत्वज्ञान आणि भूमिकेमुळे शासनालासुध्दा अलिकडे या चळवळीशी सहकार्याचे धोरण स्वीकारणे भाग पडले आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाने या चळवळीशी सतत सुसंवाद साधला आहे. एकंदरीत बळीराजाच्या उभारणीनंतर मुक्ती संघर्ष चळवळीचा प्रभाव सर्व पातळीवर वाढल्याचे दिसतो.

5. 1982 नंतरचा काळ डॉ. भारत पाटणकर आणि त्यांच्या सहका-यांनी बळीराजाच्या आंदोलनाने गाजविला. तसेच त्यांनी सांगली जिल्हा आणि महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी, कष्टकरी जनतेचे प्रश्न सतत मांडून आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. खानापूर तालुक्यातील कष्टकरी आणि डॉ. पाटणकर यांचे अतूट नाते निर्माण झाल्याचे दिसते. बळीराजा धरण चळवळीमुळे डॉ. भारत पाटणकरांच्या ठिकाणी असलेले नेतृत्वाचे लढावू गुण, अभ्यासू वृत्ती, चिकाटी, जिद्द आणि तत्वनिष्ठता या गोष्टी लोकांसमोर आल्या. त्याचबरोबर त्यांच्या सहका-यांची कष्टकरी जनतेबद्दलची तळमळ, लोकांच्या सामर्थ्याबद्दल दृढ विश्वास आणि निःस्वार्थीपणा महाराष्ट्रीयन जनतेसमोर आला. डॉ. पाटणकर यांनी आपल्या विधायक कार्याचा वापर कधीच सत्ताप्राप्तीसाठी अथवा निवडणूका जिंकण्यासाठी केलेला नाही. त्यामुळे सत्तेवर कोणताही पक्ष असला तरी कष्टकरी जनतेच्या प्रश्नांसाठी सतत झगडत राहून, राबणा-यांना स्वाभिमानाने उभे करण्यासाठी त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी स्वतःला वाहून घेतले आहे. सांगली, सातारा जिल्ह्यातील पाणी लढा, जातीय सलोखा, बीमोड दिन, पर्यावरण संतुलन यासारख्या सध्या गाजत असणा-या लढयात या मंडळीचा महत्त्वाचा सहभाग आढळतो. कठोर संघर्षातून काम उभे करण्याच्या त्यांच्या निर्धारामुळे एका नव्या पध्दतीच्या नेतृत्वाचा जन्म झाला आहे.

विद्यार्थीदशेपासून चळवळीत काम करणा-या संपतराव पवारांनी काही काळ शे.का.पक्षाचे कार्य केले. परंतु पक्षीय राजकारणाच्या चौकटीत राहून दुष्काळ हटविण्याचे काम होणार नाही याची खात्री पटल्याने त्यांनी डॉ. भारत पाटणकर व त्यांच्या सहका-यांच्या मदतीने मुक्ती संघर्ष समिती स्थापन केली. या चळवळीमार्फत त्यांनी बळीराजा धरण आंदोलन सुरू केले. या आंदोलनामुळे भाई संपतराव पवारांचेही नेतृत्व जन्माला आले. अलिकडे त्यांनी बलवडी येथे या चळवळीच्या पार्श्वभूमीवर क्रांतीस्मृतीवन उभारले आहे. एकंदरीत बळीराजा धरण चळवळीने राबणा-या कष्टक-यांचे नेते म्हणून डॉ. भारत पाटणकर आणि संपतराव पवार उदयाला आले.

6. बळीराजा धरण आंदोलनाचा आणि धरण पूर्ण होण्याचा परिणाम राजकीय व सामाजिक पातळीवर झालेला दिसतो. संपूर्ण महाराष्ट्रात या धरणाच्या निमित्ताने विकास-धोरणासंबंधी महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा झालीच पण जिल्हयाच्या राजकारणामध्येही याचा बराचसा परिणाम झाला आहे.

विकासाचा मार्ग कोणता असावा, त्या संबंधीचा महत्त्वाचा प्रश्न जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न या आंदोलनाच्या निमित्ताने झाला. प्रस्थापित राजकीय नेतृत्वाच्या मर्यादा या निमित्ताने स्पष्ट झाल्या. जनतेच्या निकडीच्या प्रश्नांवरसुध्दा स्वतःचे हितसंबंध कसे मात करू शकते हे प्रस्थापित ग्रामीण नेतृत्वाने या निमित्ताने दाखविले. म्हणजेच पर्यायी विकासाच्या आड येणारे लोक या आंदोलनाने दाखवून दिले. त्यांचे राजकारण वर्गीय हितसंबंध जपणारे आहे. हे ही या आंदोलनाच्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

7. गरीब व सामान्य जनतेला आपण पर्यायी विकास कार्यक्रम राबवू शकतो याचा आत्मविश्वास या आंदोलनाने दिला. याचाही परिणाम जिल्हयाच्या राजकारणावर झालेला आहे. या नंतरच्या कालखंडात क्रांतीवीर नागनाथ नायकवडी यांच्या अनेक कार्यक्रमांना जो प्रतिसाद सर्वसामान्य जनतेतून मिळतो त्याचे श्रेय बळीराजा धरण चळवळीला देणे भाग आहे. तसेच प्रस्थापित नेतृत्वाने दुष्काळी भागामध्ये "वसंत बंधारे"सारखे अनेक कार्यक्रम सुरू केले याचे रहस्यसुध्दा बळीराजा धरण चळवळीत आहे.

8. राजकीय पक्षांच्या चौकटीत न राहता हे राजकीय आंदोलन चालविण्यात आले. खास करून डाव्या आणि पुरोगामी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी स्वतंत्र "मुक्ती संघर्ष समिती" स्थापना करून हे आंदोलन चालविले. परंतु डाव्या आणि पुरोगामी पक्षांच्या जेष्ठ नेत्यांना या आंदोलनामध्ये स्थान मिळाले नाही. एक स्वतंत्र राजकीय गट म्हणून हे आंदोलन चालविणारे नेते पुढे आले असे दिसून येते. मार्क्सवादी विचाराने प्रेरित झालेला हा गट कम्युनिस्ट आणि शे.का.पक्षासारख्या डाव्या पक्षांशी अंतर ठेवून राहिला हे एका अर्थाने डाव्या आणि पुरोगामी पक्षांचे अपयश दिसून येते. तसेच राष्ट्रीय पातळीवरून जी शिस्त पक्षात निर्माण व्हावी लागते. त्याचीही उणीव या नव्या राजकीय गटात दिसून येते. याचा परिणाम म्हणूनच मुक्ती संघर्ष समितीत तात्विक मतभेद ताबडतोबीने सुरू झाले.

9. रोजगार निर्मिती, पर्यावरण संतुलन, समान पाणी वाटप व स्वावलंबी आणि निर्भर शेती या संदर्भात नवा विचार लोकांच्यावर बिंबवण्याचा यशस्वी प्रयत्न या आंदोलनाने केला आहे. त्याचबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंधश्रध्दा निर्मूलन याचे महत्त्वाचे कार्य या आंदोलकाच्याकडून झाले आहे. सामाजिक समस्याकडेही मोठया प्रमाणात आंदोलकांनी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

लक्ष दिले आहे. स्त्रियांच्या प्रश्नांच्या संदर्भात आंदोलकांनी भरीव कार्य करून समतेच्या तत्वाने उभ्या राहणा-या आधुनिक समाजाच्या बांधणीला सुरूवात केली आहे.

## xxx संदर्भ xxx

1· पाटणकर भारत व पवार संपतराव, "बळीराजा स्मृती धरण माहिती पुस्तिका, बळीराजा धरण कृती समिती व मुक्ती संघर्ष चळवळ, पृ·4 व 5

2· तत्रैव, पृ·14 व 15

3· तत्रैव, पृ·14

4· सुप्रीम कोर्ट, नवी दिल्ली, दि·10/11/1989 च्या डी·नं·1542/88/एस·सी·/ पी·आय·एल·सी· च्या निकालपत्रावरुन·